# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र.२५६५१४३ फॅक्स क्रं. ०७१२–२५६१६६३

E-mail:ronagpur.dte@gmail.com Web:- rdtenagpur.org.in

क्रमांक :—तंशिस/प्राकाना/शैवि२/केंप्रप्र /२०१३/1060

दि.:— 6 APR 2013

प्रति,

प्राचार्य,

विना अनुदानित अभि/औषधनिर्माणशास्त्र/ पदविका संस्था

विषय:— शैक्षणिक वर्ष २०१३—१४ मधील प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेसंबंधी शपथपत्र सादर करणेबाबत.

संदर्भ :— १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम /पदविका /केंप्रप्र/२०१३/७४, दि. ३०/०१/२०१३.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/प्राकाना/शैवि२/पदविका/२०१३/३२४/, दि. ०२/०२/२०१३.
३) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम /पदविका /केंप्रप्र/२०१३/१८४, दि. १९/०३/२०१३.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, संदर्भ क्र. २च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१३—१४ करिता केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट होण्यासाठी पदविका अभ्यासक्रमातील विनाअनुदानित संस्थेचे शपथपत्र मागविण्यांत आले होते. परंत संस्थेच्या शपथपत्रात काही त्रुटी दिसून आल्या आहेत.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी विहित नमुन्यातील शपथपत्र सादर केले नाहीत अशा संस्थानी संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे विहित नमुन्यातील शपथपत्र या कार्यालयात त्वरित सादर करावे. सोबत जोडलेले विवरणपत्रातील शेरा पहावा. तसेच ज्या संस्थेत अध्यक्ष किंवा सेक्रेटरी पदे अस्तित्वात नसल्यास त्याबाबत संस्थेचा खुलासा सादर करावा.ज्या संस्थेचा खुलासा या कार्यालयास सादर केला जाणार नाही त्या संस्थांना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यांत येणार नाही व याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील, याची संस्थेने नोंद घ्यावी.

तसेच सर्व विनाअनुदानित संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१२—२०१३ मध्ये ज्या विनाअनुदानित संस्था केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट होत्या परंतू शैक्षणिक वर्ष २०१३—२०१४ साठी अद्यापपर्यंत कॅपमध्ये सहभागी होणेबाबत किंवा सहभागी न होणेबाबत विहीत नमुन्यातील शपथपत्र सादर केले नाहीत, अशा संस्था शासन/संचालनालय यांचे नियम पाळत नसल्याने सदर बाबत योग्य ती कार्यवाही करण्यांसाठी प्रस्तावित करण्यांत येईल .याची संस्थेनी नोंद घ्यावी.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.

प्रत :— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यांकरिता.